म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४६३



REFBK-0023626
REFBK-0023626

2४६३
२३६२६
११।५।८२

# ड्रॅगन पोएट्री

REFBK-0023626
REFBK-0023626

"सारा भारत बौद्धमय करीन"
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या
ध्येयपूर्ततेसाठी सर्मपित

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2४६३
क्र. २३६२६
काव्य ११।५।८२
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

मधु गवई

प्रथम प्रकाशन :

१४ एप्रिल १९८२,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती दिन.

प्रकाशक/मुखपृष्ठ/सर्वाधिकार :
मधु गवई,
विजयनगर, वॉर्ड नं. १०, बुलढाणा.

मुद्रक :
सुप्रिन्ट, अशोक सिनेमासमोर,
उल्हासनगर–३.

आगामी :

"वैचारिक संघर्षाचा बंडखोर अविष्कार"

**ड्रॅगन्स डेन**

(कविता संग्रह)

DRAGON POETRY
(Marathi)
MADHU GAWAI

□ शस्त्र धारण करणें हा आपलें मानवी स्वातंत्र्य मिळविण्याचा शेवटचा उपाय आहे □

– डॉ. बाबासाहेब आंबेडकर



□ स्वसंरक्षणाचा निर्णय घेऊन बेडरपणें मी येतोय तुमच्याकडे
बुद्धाचे शब्द घेऊन □

## आभार

आयु. एल. एस. जाधव
आयु. मधुकर सोनवणें
आयु. ए. एम. कांबळे
आयु रामचंद्र शिंदे
आयु. महादेव गायकवाड
आयु. नारायण कांबळे
आयु. बुद्धप्रिय म्हस्के
आयु शिवाजी हिवाळे
आयु. हरिश खंडेराव
आयु. गौतम शिंदे
आयु. अशोक चक्रवर्ती
आयु. राजाभाऊ काजरोळकर
आयु. रामेश्वर सुरडकर

## अनुक्रमणिका

पान नंबर


| | |
|---|---|
| मशाली पेटवून | १३ |
| मी तलवार परजून घेतोय | १४ |
| कवितेची कैफीयत | १६ |
| मीं स्विकारलेल्या भूमिकेमूळें | १७ |
| आम्ही सूर्यालाही अंकित करु | २२ |
| गनिमी आयुष्यात | २४ |
| आपण असे शब्द जगू | २५ |
| कायद्याविरुद्ध | २८ |
| बुध्दाचे शब्द घेऊन | २९ |
| पेरणी | ३२ |
| संदेश | ३३ |
| उठाव | ३५ |
| आम्ही आहोत | ३८ |
| कबर | ३९ |

पान नंबर


| | |
|---|---|
| क्रांतिप्रवन धम्माच्या विद्रोही वाटेवर | ४० |
| उरस्फोटातून उसळलेल्या शब्दानच | ४३ |
| कुणी भेटलेच तर | ४५ |
| प्रबुद्धत्व | ४६ |
| धम्म | ४७ |
| कम्म | ४८ |
| ड्रॅगन पोएट्री | ४९ |
| ' अत्त दीप भव ' | ५२ |


❁❁❁

## भूमिका □

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४६३
दा. क्र. २३६२६
काव्य ७११५८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

□ भारतीय लोकशाहीच्या उज्वल भवितव्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जीवनमार्ग म्हणून दिलेला 'बौद्धधम्म' भारतीय समाज-मनात रुजविणे आवश्यक असून त्यासाठी वैचारिक आंदोलनाची अत्यंत गरज आहे. 'वैचारिक आंदोलन'संदर्भात बौद्धधम्माशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार करणे म्हणजे त्यांच्या ध्येयवादावर आघात कर-ण्यासारखे असून नेमके हेच 'क्रांतिदर्शी' साहित्य निर्माण करणाऱ्या दलित साहित्यिकांकडून जाणता अजाणता घडून येत आहे. "दलित हे जागतिक दुखणे आहे" अशी व्यापक जाण व्यक्त करून ह्या दुखण्यावर इलाज म्हणून दलित साहित्यिकांनी "दलित जनतेची बाजू घेणारे जगातील सर्व तत्त्ववेते आमचे आदर्श" असे उद्घोषून केलेली वाटचाल "न घर की न घाट की" अशी ठरली असून दिशाहिन झाली आहे. "जो नवे जग निर्माण करण्यास झटतो तो दलित" अशा प्रकारची विधानं करीत आख्ख जग दलित करण्याच्या धुमधडाक्यात आंबेडकर की मार्क्स की दोहोंचा समन्वय अशा वादविषयाला खतपाणी घालून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गतिमान केलेल्या बौद्ध चळवळीचें खच्चीकरण आरंभिले

आहे. "दलित नुसतेच बौद्ध नसून जे जे मागासलेले आहेत ते " अशा प्रकारच्या अधिकाधिक व्यापकार्थाच्या व्याख्या करून बौद्धधम्माबद्दलचे अज्ञान घोषित करीत दलित साहित्यिकांनी जी दलित अस्मिता नि वर्गीय 'घमेली' भूमिका स्विकारलेली आहे, ती तकलादू ठरली असून निकालात निघाली आहे. अशा तकलादु नि निकालात निघालेल्या भूमिकेचा डांगोरा पिटतांना ते वर्गिय आव आणून सवाल करताहेत. "आम्ही भूमिका स्विकारली आहे, तुम्ही केव्हा स्विकारणार ?" असा सवाल करून त्यांनी स्वतःचे हसे करून घेतले आहे. त्यांची कीव करावी तेव्हढी थोडीच आहे. "प्रस्थापित हे दलितांना दलित ठेऊ पहातात" ही प्रस्थापिता विरुद्धची ह्या दलित साहित्यिकांची 'विद्रोही बोंब' टवाळखोरांच्या उलटच्या बोंबातली ठरली आहे. कारण ते स्वतःच स्वताला अट्टाहासाने दलित म्हणवून घेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना 'दलित सूर्य' म्हणण्यापर्यंत त्यांनी मजल मारली आहे. ह्या असल्या मऱ्हाठी 'शारदेची गान्ड' फोडणाऱ्या दलित साहित्यिकांनी त्यांची गान्डमान्डोळी भूमिका गान्डमान्डोळी चळवळ, गान्डमांडोळी वाटचाल, गान्डमान्डोळी धोरणं पारखून डोळसपणे वाटचाल केली पाहिजे, दलित राहून बौद्धधम्माचा प्रचार नि प्रसार करणाऱ्या ह्या दलित साहित्यिकाची वळवळ नि चळवळ म्हणजे पालीच्या तुटक्या शेपटीची तडफड असून बौद्ध चळवळीपुढे ती थंडावत आहे, नि थंडावणार आहे. हे त्यांनी वेळीच समजून सावध म्हणजे बौद्ध झाले पाहिजे. बौद्धत्व हे दलित्व वा हिंदुत्व नसून क्रांतित्व आहे, हे जाणलं पाहिजे, समजून घेतलं पाहिजे. वयात आल्यासारखं

मॅच्युअर झाल्यासारखं झाल्यावाणी वागलं पाहिजे लिवलं पाहिजे. "दलितांमध्ये महार व नवबौद्ध आहेत तसेच इतर पूर्वास्पृश्य लोक आहेत". असे म्हणणाऱ्यांना बौद्ध हे मानवजाती समोरील आदर्श आहेत हे दाखवून देणें प्रत्येक बौद्धाचे कर्तव्य आहे ह्या कर्तव्याशी ड्रॅगन पोएट्री ह्या कविता संग्रहाच्या रुपाने मी माझे नाते जाहिर करत आहे. □

□ माझीं कविता माझ्या जीवन निष्ठेचे भाष्य आहे. म्हणूनच ठाम निश्चयाने मी म्हणतो की, " मी बौद्ध आहे आणि बौद्ध म्हणूनच मरणार आहे "ह्या मार्गाने जातांना स्वाभाविकपणें मी माझे जीवनचरित्र घडवणार आहे. तेव्हा सर्वहारा, शोषित, पिडित, दलित, उपेक्षित, बहिष्कृत कष्टकरी जनतेपर्यंत बौद्धधम्माचे जीवनव्यापी मानवतावादी तत्वज्ञान पोहचविणें हे माझे जीवन कर्तव्य आहे आणि ते मला केलेंच पाहिजे ते करण्यास हवे असलेंलें वैचारिक सामर्थ्य देण्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ध्येयवादी तत्वज्ञान समर्थ आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे घडवून आणलेल्या बौध्दधम्मक्रांतीस नाक मुरडणारांचे नि धर्मांतर म्हणजे देशद्रोह, राष्ट्रांतर म्हणणारांचे डोळे उघडण्यासाठी " सारा भारत बौध्दमय करीन" ह्या डॉ. आंबेडकरांच्या ध्येयपूर्ततेसाठी कृतिशील होणें आवश्यक आहे □

□ भारतीय समाजात घडणाऱ्या अगन्ति अन्याय अत्याचारांना जातिभिमानाचे उच्चनीचतेचे अधिष्ठान असल्याचे प्रत्ययही अनुभवास येत

आहे. बहुतांश समाज जुन्या रूढी रित रिवाज विचारपरंपरेच्या चौकटीतच वावरत आहे. अशा प्रकारे सामाजिक समता नाकारण्यास कारणीभूत ठरणाऱ्या समाजमनात बदल घडविणे आवश्यक आहे. कारण हिंदुधर्मग्रंथातील विचारांनी पछाडलेल्या सवर्णसमाजमनाने अन्यायअत्याचाराबाबत परिसिमा गाठली आहे. आखिल मानव जातींच्या जीवनकल्याणाच्या दृष्टिने कार्लमार्क्सने सांगितलेल्या जीवनमार्गापेक्षा अधिक योग्य आणि सुरक्षित मार्ग म्हणून लोकशाहीधम्माची म्हणजेच बौद्धधम्माची अनिवार्य आवश्यकता सांगणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पुतळे ह्याच विकृत मनोवृत्तीतून मराठवाड्यात व इतरत्र फोडण्यात आलें व येत आहेत. ही देशभर असलेली मनोवृत्ती ठेचून काढणे, तिचा नायनाट करणें ती उखडून काढणें, तिचे समूळ उच्चाटन करणें, तिच्या विध्वंसनासाठी तिच्या विरोधी शैक्षणिक व सामाजिक बंडखोरी तयार करणें, सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठेसारख्या हरेक साधनाचा वापर नि उपयोग करणें आवश्यक आहे. ह्या आवश्यकतेतूनच निर्माण झालेली माझी कविता बौद्धधम्मास बिरोधी असलेल्या हरेक प्रवृत्तींवर आघात करतांना बौद्ध बनते. गुलामगिरीला, अराजकतेला, असंतोषाला कारण ठरलेल्या हिंदूधर्म आणि संस्कृतींला बळ पडलेल्या शिक्षण व्यवस्थेची री ओढणाऱ्या प्राध्यापकांना हरामखोर ठरवून कुलगुरुची तोंडफोड करते. वेदाभ्यासानच ह्या देशात सर्वंकष क्रांति घडवून आणु पाहणाऱ्या, गीतेचे गुणगान गात गोहत्याबंदिसाठ आमरण उपोषणास बसणाऱ्या लबाड आचार्यांना होबकाढून नि चाबकाडून ताळ्यावर आणू पहातेय. स्वधर्म बंधूस धेड म्हणून

हिणवणाऱ्या हिणकस मनोवृत्तीच्या कातडी बचावू व्हॉईट कॉलर, लबाड, नीच नि हलकट देशभक्तांशी नि त्यांच्या धर्मांशी ह्या कवितेचे उघड उघड शंभर टक्के हाडवैर आहे. हे हाडवैर निभावण्यासाठी अन्याय अत्याचार दडपशाहीच्या विरोधात, परंपरागत प्रतिगामी विचार व्यवस्थेच्या विध्वंसनासाठी व मानवी मुल्यांच्या प्रस्थापनेसाठी तिचं विद्रोही आविष्करण. चंड, संताप, त्वेषाच प्रकटीकरण, भावनेच विचाराच स्फोटकपण स्वाभाविकपणें ड्रॅगनच्या आक्रमक प्रतिकामधून अभिव्यक्त होते, आकार घेते. अविष्कृत होते, तिचं ड्रॅगनत्व तिच्या विद्रोहाविष्कारात आहे आणि तिचा विद्रोहाविष्कार ड्रॅगन पोएट्र नावातून डोळस नि प्रभावीपणें व्यक्त होतो. तिचं व्यापकपण तिच्या नावात आहे आणि तिच्या नावातून ते जाहिर होतेय. भाषा संकेताच्या नि सीमांच्या तटबंदीपार असलेल्या मानवीं समाज जीवनाची ती दखल घेते. धम्मतत्वज्ञानाचा प्रचार म्हणजे समता स्वातंत्र्य विश्वबंधुत्वाचा आग्रह हे तिच ध्येय आहे म्हणूनच तिला घडवतांना आकारताना 'उठाव' ह्या कवितेत मी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १६ जून १९३६ रोजी धर्मांतराचे महत्त्व व आवश्यक्ता नि अपरिहार्यता विशद करतांना केलेंले वक्तव्य उदघृत करतो. □

□ बौद्धधम्म म्हणजे समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाधिष्ठित समाजनिर्मितीसाठी मानवीमन घडविणारा लोकशाही परंपरा जपणारा, क्रांतिप्रवण विचार आहे. हा विचार जो पर्यंत समाजमनात रुजविला

जात नाही. तो पर्यन्त समाज जीवनाला ग्रासून असलेला विध्वंसक संघर्ष सुरू राहणार आहे. तो टाळण्यासाठी समाजमनावर साहित्याचा परिणाम घडवून आणणें आवश्यक असून ते साहित्यिकांच्या हाती आहे. कारण वैचारिक हल्ल्याच हत्यार ते घडवू शकतात परजू शकतात वापरु शकतात. लोकशाही मुल्यांच्या म्हणजेच बौद्धधम्माच्या पुनरुज्जीवनासाठी सामाजिक पुनरुत्थान आवश्यक आहे. म्हणून साहित्यिकांनी ते घडवलें पाहिजे, परजलें पाहिजे, वापरलें पाहिजे. बौद्ध साहित्य म्हणजें बौद्धीक बंडखोरी आहे वैचारिक हल्ल्याच हत्यार म्हणजे बौद्ध साहित्य आहे. मानसाला वेठीस धरणारी विचारसरणी ठोकरते ते बौद्ध साहित्य आहे. □

□ सामाजिक अभिसरण आणि पुनरुत्थानासाठीं संस्कार घडविण्याच्या दृष्टिने जबाबदार असलेंल्या शिक्षण व्यवस्थेत अमुलाग्र बदल घडविणें आवश्यक आहे. कारण ह्या देशाला स्वातंत्र्य मिळून चौतिस वर्ष होताःयत तरी लोकशाहीस पोषक समाजमन प्रचलित शिक्षणव्यवस्था तयार करु शकली नाही. हिंदुविचार प्रणालीतील कमकुवतपणाने आजची शिक्षण व्यवस्था पूर्णता पोखरून काढली गेली आहे. ह्या कमकुवतपणाचे हिडीस रुप देशभर मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या नावाखाली आणि गुजरातमध्ये राखीव जागा विरोधी आंदोलनातून शोभायात्रा नि अंत्यागंन्या मेळाव्यातून उघडे नागडे झाले, केलें गेलें आणि इतरत्र होत असून धुमसत आहे. हिंदुधर्म आणि समाजव्यवस्था लोकशाहीस किती पोषक

आणि उपकारक आहे हे देशभरच्या अन्याय अत्याचारांतून सिद्ध होत आहे बेलछी मीनाक्षिपूरम देवळी, सादुपूर येथील दलितांवरील अत्याचार ही त्याची ताजी उदाहरणें आहेत. ह्या देशातील राजकीय लोकशाही म्हणजे सावळा गोंधळ आणि सामाजिक लोकशाही म्हणजे गोंधळात गोंधळ आणि आर्थिक लोकशाही म्हणजे गोंधळाचा कळस ठरली आहे. ह्या रगाडयात सुरक्षितता नि उज्वल भवितव्यासाठी दलितांची धर्मांतराकडे वाटचाल सुरू आहे. धर्मान्तराने हिंदुधर्म आणि समाज हादरुन गेला आहे. हिंदुधर्म स्वतःच स्वतःचा नाश करुन घेईल हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भाकित खरे ठरत आहे. भारताचे इस्लामीकरण न होता. बौद्ध 'बौद्धमय भारत' होणें हे सामाजिक पुनरुत्थान आणि लोकशाही मुल्य रुजविण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच हा कविता संग्रह 'बौद्धमय भारतसाठी' धर्मान्तराचा पुरस्कार नि पाठपुरावा करीत आहे. सूडाची नि बदल्याची भाषा ही यादवी युद्धाचीच भाषा आहे. ती ह्या समाजाला आणि देशाला मारक नि घातक ठरणार आहे. धर्मांतर हा सूड वा बदला नसून नवजीवन आहे. □

□ सवर्णीयांची बांझोटी मनं कायद्यावर कुरघोडी करुन सर्वसामान्य माणसाला मानवी हक्कापासून परांगदा करताहेत. प्रत्ययही हेच ठायीठायी अनुभवास येत आहे सुरक्षिततेसाठी शस्त्र आणि सत्ता तर सहजीवनासाठी मन परिवर्तन आवश्यक आहेत. मनपरिवर्तनासाठी वैचारिक साहित्य आवश्यक आहे वैचारिक साहित्यांचे घणाघाती आघात घडवून आणण्यासाठी

साहित्यिकांनी बौद्धधम्माचा क्रांतिकारक मार्ग स्विकारणें आवश्यक आहे. बौध्दधम्मच ह्या देशात सामाजिक सांस्कृतिक राजकीय धार्मिक, आर्थिक चळवळ लोकशाहीं मार्गाने घडवून आणण्यास समर्थ असून आवश्यक आहे ह्या आवश्यकतेंतूनच भारतीय समाज व्यवस्थेच्या संदर्भात समता स्वातंत्र बंधुता व न्यायाधीष्ठीत सामाजिक पुनरत्थ न घडवून आणण्यासाठा वैचारिक संघर्षाचा ध्येय निष्ठ अविष्कार म्हणजे माझी कविता माझे हत्यार माझी भूमिका ! □

□ तामिळनाडू राज्यातील मीनाक्षीपूरम येथील दलित जनतेने इस्लाम धर्म स्विकारुन धर्मांतराचा इंगा दाखवताच त्यांच्या सभोवती पिन्गा घालू लागलेल्या नुसतेच लक्ष वेधालेल्या आणि धर्मांतरीत झालेल्या व न झालेल्या तमाम भारतीय जनतेस बौद्धधम्माचा स्विकार, प्रचार नि प्रसार करणारा 'ड्रॅगन पोएट्री' कवितासंग्रह मी सादर करीत आहे. □

□ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या बौद्धतत्वज्ञानासाठी बौद्ध साहित्यिकांनी सामाजिक बांधिलकी स्विकारणें अपरिहार्य ठरतें सामाजिक बांधिलकी बौध्द साहित्याचा आवश्यक भाग आहे ह्या बांधिलकीचा एक भाग म्हणून मी लिहिलेंल्या कवितेविषयी माझे स्नेही गौतम शिंदे यानी " तिच्या ( बौध्दशक्ति ) आड कोणीही जाऊ शकत नाहीं आणि कोणीं आड आलाच तर तो आडवा झाल्याशिवाय रहाणार नाहीं. " असे जे निडर विचार आविष्करण लिहिले ते मीं पुढे देत आहे □

---

**मधु गवई** विजयनगर, वार्ड नं. १०, भादोला रोड, बुलढाणा, तालुका -बुलढाणा जिल्हा - बुलढाणा

अविष्कार □

## मेतं करोथ मानुसिया पजाय ।

'मनुष्यजातीवर प्रेम करा !'

– तथागत बुद्ध.

□ बौद्ध साहित्याचा प्रवाह मराठी भाषेतून आता ओघाने वाहु लागलेला आहे साहित्याबरोबरच आता बौद्ध समीक्षा आकार घेऊन अधिकाधिक समृध्द होत आहे सध्याच्या मन्वंतराच्या काळातील एक ठळक दुवा म्हणून साकारली आहे मधुची 'ड्रॅगन पोएट्री' □

□ बौद्ध धर्माचा भारत देशात प्रादुर्भाव ही फ्रेंच राज्य क्रांतीच्या तोडीची घटना असल्याचे डॉ बाबासाहेबांनी आपणास सांगितलें इतकेच नव्हें तर धर्मांतराच्या कृतीने आपणास पटवूनही दिलें तथापि योग्य त्य प्रबोधनाच्या अभावी ही समग्र क्रान्तीप्रवण प्रेरणा तोलूत धरण्याचे सामर्थ्य डॉ.बाबासाहेबांच्या अनुयायांमध्ये आलेंलें नाही, ही वस्तुस्थिती आहे. आणि ही वस्तुस्थिती डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा सच्चा अनुयायी बदलल्या शिवाय राहणार नाही. त्याचे ते कर्तव्यच आहे. हया देशातील जाती विषमता, अज्ञान व दारीद्रय नष्ट करायचे असेल तर बौद्धधर्माचाप्रसार केला पाहिजे. माणसाला पूर्णावस्थेत आणण्यासाठी सुसंस्कृत करण्यासाठी काही करायचे

असेल तर बौध्दधर्माचा प्रसार केला पाहीजे बौध्दधर्म ही या देशात सम्यक परीवर्तन घडविणारी अद्वितीय शक्ति आहे. ही शक्ति अपरिहार्य पणें स्वीकारावी लागेल. तिच्या आड कोणीही जाऊ शकत नाही आणि कोणी आड आलाच तर तो आडवा झाल्याशिवाय राहणार नाही.

बौध्दधर्माच्या आधारे ह्या देशातील समाजव्यवस्थाच नव्हे तर मानसिक परिवर्तनही घडवायचे आहे,आणि ही जबाबदारी आहे बौध्द साहित्यकाची. मधु गवईला याचे सम्यक् भान आहे. बौध्द साहित्यातून केवळ बौध्द संस्कृती निदर्शक शब्द किंवा निष्क्स दिसतात असे नाही तर बौध्द संस्कृतीने परीपोष झालेंल्या मनांचा अविष्कार त्यातून होतो, हा सर्वाधिक महत्वाची बाब आहे. 'बौध्द मानसिकतेचा अविष्कार' हाचबौद्ध साहित्याचा आकार, प्रकार आणि निर्धार आहे. मधु गवईची कविता केवळ बौध्द संस्कृती विषयी बोलत नाही. बौध्द संस्कृतीच त्याच्या कवितांतून बोलतें. मधुची कविता महान संस्कृती-संभवाचे कार्य स्विकारते. सुरुंगाची दारु जशी कभिन्न कातळाचा छेद घेते तशी मधु गवईची कविता इथल्या बदनाम संस्कृतीचा वेध घेऊन तिच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडविते, त्याच्या विद्रोहाची तात्त्विक बैठक बौध्द धर्मावर आहे. समता : स्वातंत्र्य आणि विश्वबन्धुत्व या तत्वत्रयीने त्याच्या कवितेचा परिपोष झालेला आहे, झगडायच आहे. ते या तत्त्व-त्रयीची प्रस्थापना करण्यासाठी जगायच आहे, ते या त्रयतत्वाना आदर्श मानून स्वातंत्र :विश्वबन्धुत्व :समता हि तीन तत्त्वे अनुक्रमे बुध्द: धर्म:

संघ या त्रिसरणाची जणू प्रतीकेच होत! हीच ती आंबेडकरीं प्रेरणा! तिचे नाव ' बौद्ध प्रेरणा ' !

' बौद्ध ' हा शब्द पारंपारिक ' धर्म 'सकल्पनेशी जोडण्याचा काही विद्वान प्रयत्न करतात त्यांना अस्पृश्य, आदिवासी व भटक्या जमातीचा समावेश बौद्ध संकल्पनेत कसा करावा असा प्रश्न पडतो. म्हणून ते त्यांना घेण्याच्या प्रयत्नात बौद्धानाही ' दलित ' संज्ञा देऊन मोकळे होतात. परंतु ' अस्पृश्य मूळचे कोण ? ' हा डॉ बाबासाहेब आंबेडकराचा ग्रंथ ज्याने मनपूर्वक वाचला आहे त्याला अस्पृश्य, आदिवासी आणि भटक्या जमाती या मूळच्या ' बौद्ध ' होत्या हे सांगण्याची आवश्यकता नाही. सुधारणा वादी विचार ज्यात येईल ते बौद्ध साहित्य असे का म्हणू नये? प्रत्येकजण जातीयवादीं असतो." असे जातीचे समर्थन करणारा माणूस जर आपल्या बाहुत प्रचंड सामर्थ्य आहे असे म्हणत असेल तर ते पॅरलिसिसमुळे बाहू लूळे पडून जड झाल्यामुळेच तसे म्हणत असला पाहिजे. जात साठी माती खाऊन या देशातील कित्येकांना मूडदुस झालेला आहे त्यावर एकच मात्रा आहे बौद्धधर्म ! बौद्धधर्म या देशातील समग्र क्रांतीकारी चळवळीचा स्थायी भाव आहे. बौद्धधर्मास अव्हेरुन या देशात कोणत्याच बाबतीत प्रगती होऊ शकत नाही मग आमच्या साहित्याला ' बौद्ध साहित्य ' का म्हणू नये ? ज्यांना पंचशीलाचे वावडे आहे असे चारित्र्यहिन लोक नेहमीच बौद्धधर्मापासून फटकून राहिलें आणि राहतील. " बौद्ध साहित्यिक " म्हणवून घेण्यात एक नैतिक जबाबदारी आहे. ही जबाबदारी

मधू गवईने स्विकारली आहे. जगातील ९० टक्के दुःखाने पीडलेल्या गरीब माणसांना मुक्त करणें हे बुद्ध धर्माचे मुख्य कार्य आहे, असे बाबासाहेबांनी आपणाला सांगितलें. बौध्द साहित्याचाही हाच हेतू आहे दुःखितांना पीडितांना, गरिबांना आशादायक वातावरण निर्माण करणें त्यांच्यां हीतार्थ त्यांच्या हातीं अन्यायाचा, जुलूमाचा प्रतिकार करण्यासाठी वैचारिक हत्यारे देणें, हे बौध्द साहित्याचे मुख्य कार्य आहे. बौध्द साहित्य हे बौध्द मनाचं बौध्द मन घडविणारं साहित्य आहे. आम्हाला लूत अंगावर घ्यायची नाही तर लूतच न होईल अशी व्यवस्था करायची आहे. आम्हाला फौड पोंबळायचा नाही तर फोड फोडून दुःख नष्ट करायचे आहे. मग कितीही वेदना झाल्या तरी बेहत्तर, आम्हाला नुसत चालायच नाही, आम्हाला योग्य दिशेने आणि जबाबदारीनं चालायचं आहे. डुकरांच्या जगण्यात आणि माणसांच्या जगण्यात हाच मूलभूत फरक आहे. मधु गवई, अशोक चक्रवर्ती, प्रभाकर गांगुर्डे, मुरलीधर कांबळे, बुध्दप्रिय म्हस्के, भास्कर देहाडे, हरीश खंडेराव, सुरेश खडताळे, रतनकुमार पाटलीपुत्र, इत्यादि बौध्द साहित्यिकांनी जी जबाबदारी स्विकारलेंली आहे ती म्हणूनच अधिक मोलाची आहे, □

□ “ बेडरपणें मी येतोय तुमच्याकडे

बुद्धाचे शब्द घेऊन ” असे म्हणणाऱ्या मधुने आपली बौद्धधर्म प्रचारकाची भूमिका स्पष्टच केलेंली आहे. मधुला सम्यक स्वातंत्र्य बुद्धाच्या कोरींव लेण्याप्रमाणें समाजमनात कोरायचं आहे. समाजमनात घडवायच आहे. म्हणूनच तो म्हणतो ;

बुद्धाची कोरीव लेणी
स्मितांकित चेहरा
तुम्ही सर्व ' स्वतंत्र आहात '
' अशी पेरणी करायची '

बौध्दधर्म प्रसार हे प्रत्येक बौध्दाच जीवितकार्य आहे, कर्तव्य आहे. म्हणूनच बौध्दधर्माच्या शत्रूविरुध्द बौध्द कवी मधु गवईनं सम्राट अशोकाच्या सिंहस्तंभावर तलवार परजून घेतलेली आहे. ' सम्यक संस्कृती ' घडविण्याचं महान कार्य अंगिकारलं आहे, म्हणूनच तो ठामपणें सांगू शकतो :

" जीवन मरणाच्या रहदारीत
मरणासारखं मुकेपण जगनं
आता संपलआहे. "

आता केवळ तो बोलत नाहीं. देव, आत्मा, ब्रम्ह, वेद, मोक्ष ह्यांची धुळधाण करतो, ' काळाबरोबर वाहणारी ही वाढती झुंज ' देण्यास तो ' सूर्यालाही अंकित करण्या ' इतके सामर्थ्य घेऊन येतो.

" बुध्दि तर ज्ञान मिळवा
डोळे तर दृष्टि मिळवा
हात तर हत्यार मिळवा
पाय तर मार्ग मिळवा

असा संदेश देत बहकलेल्या व्यवस्थेला तळागाळातून उखडून फेकण्याचा निर्धार जाहिर करतो.

□ "मरतांना शेवटी मरणावरती
पौर्णिमेसारखं हसायचं हाय"

या ओळीं समग्र जीवनाला निश्चित अशी बौद्ध जीवनपद्धतीं लाभल्याचेच व्यक्त करतात. वैशाख पौर्णिमेसारखं संपन्न जीवन हे आपल्या मानसिक संपन्नतेवर अवलंबून आहे. साहित्यामागचा हेतू काय? साहित्य आहे कोणासाठी ? सर्व गोष्टींचा माणूस केंद्र बिंदू असला पाहिजे असं बुद्ध शिकवतो. मानवी कल्याण हा त्याचा हेतू आहे. म्हणूनच मानवी हिताच्या आड येणाऱ्या शत्रूविरुद्ध लढतांना त्या 'लढ्याला सामर्थ्यं' देणारे आणि 'जन्माला जीवन' देणारे शब्द जगण्याचा मनोदय मधु जाहीर करतो. □

□ 'ड्रॅगन' हे चीनमधील एक काल्पनिक मानचिन्ह आहे. बौद्ध भिक्षूंनी शोधलेल्या 'कुंग फू' या स्वसंरक्षणाच्या कलेत ते सामर्थ्यांचे प्रतिक मानले जाते अजस्त्र पंख असलेंला, अनेक नखेरी पायांचा, अक्राळ विक्राळ, चपळ जहरी सर्पं असे 'ड्रॅगन' चे वर्णन करता येईल. मधु गवईची कविताहीं असच झपाटणारं सामर्थ्यं घेऊन उभी आहे ती विनाशक जरूर आहे पण ती विनाशकांची विनाशक आहे. ती बौद्ध नागवंशाशी असं उघडच नातं सांगते. मधुच्या ह्या पहिल्या काव्यसंग्रहातूनच त्यांचे विचार आणि आकांक्षा स्पष्ट शब्दातून व्यक्त झाल्या आहेत. त्यांच्या पुढचा भविष्यकाळ स्पष्ट आहे बौद्ध साहित्यातून उगम पावणारे हे न ऐकलेले सूर अधिक मधुर आहेत हे सांगण्याची आवश्यकता नाही. मराठीत असे किती तरी सूर येतील, ऐकायला मिळतील. सप्तसूरांच्या समुद्रालाही ते ओलांडून जातील ! □

– गौतम शिंदे –

# मशाली पेटवून

आपण
आयुष्याला आयुष्य सर्मपित करू
नजरेसमोर जळणाऱ्या
आपल्याच अवलादीच्या सरणावर
मशाली पेटवून मागे फिरू
बेचिराख घरं दारं ओलांडून
आत येऊ
त्यांच्या खणाखणातील
खलबतखाण्यांना
आगी लावत उध्वस्त करू.

# मी तलवार परजून घेतोय

जीवन मरणाच्या रहदारीत
मरणासारखं मुकेपण जगणं
आता संपल आहे.

आमचा मनोदय मुक्तिमार्ग
बेडरपणे जगजाहीर करतांना
आमच्या जन्माला नवजीवन मिळतं आहे.

दिक्षाभूमिवर
तू साऱ्या जगाला गर्जुन सांगितलेस
उद्धार नाही बुद्धाशिवाय
तेंव्हापासून
तुझे मनोस्वप्न
आमचे जीवन झाले आहे.

म्हणूनच

मनुने केलेली मुस्कटदाबी झुगारतांना
आम्ही
देवाची दुनियादारी दफन करताहोत
आत्म्याच नागडंपण जगजाहीर करतांना
ब्रह्मांडावर शेवटची मुठभर माती टाकताहोत
वेदांची आज्ञा नाकारतांना
मोक्षाची अभिलाषा ठोकरताहोत

ब्रह्मसत्याच्या धर्माला सुरुंग लावतांना
संस्कृत – संस्कृतीची धुळधाण करताहोत

अशावेळी
हे प्रियदर्शी राजा
तू घडविलेल्या सिंहस्तंभावर
मी तलवार परजून घेतोय.

# कवितेची कैफीयत

कविता
कबुली जबाब देतेय
सांगतेय
भर वर्गात ते पकपक करतात
विद्यार्थ्यासह तेही उदास
गीता शिकवतात
सुसंस्कारी स्वातंत्र्यात
ज्ञानेश्वरी शिकवतात
दररोज वृत्तपत्रातली बातमी
भलतं सलतं सांगत राहते
मन पेटून उठतं
खरोखरच
ते सत्याची प्रतारणा करतात
खोटं नाटं शिकवतात
जीवनासाठी वांझोटी भाषा वापरतात
कवितेची कैफीयत माझ्या मनात
खरोखरच का ते प्राध्यापक शोभतात
हरामखोर साले
तेच ते शिकवतात
म्हणून दोस्तानों
तोंडफोडीला सुरवात झाली आहे.

## मी स्विकारलेल्या भूमिकेमूळे

कुलगुरु तुला कविता कळते कारे
सांग मग
तू का मारलेहेस खुळ आमच्या मस्तकी
आख्यानक कवितेचे कामुनतेरे
अरे
"अनुसया अतिथिच्या सांगण्याहून
नागडी होते येते
येताच
अतिथिची बाळं होतात रडू लागतात
अनुसया सगळयांना स्तनपान करते
उपनिषदं गाते अन् बाळांना झोप येते"
कुलगुरु ह्या भाकड सांस्कृतिक संस्कारांनी
माणसांची अशी माकडं झालीयत
ज्यांच्या चेष्टांनी
माणसाला माणूस म्हणून जगणं
हरघडी मुश्किल होतय.

शिकवतांना
सर डिसमुड नि खजिल होतात म्हणतात
आख्यानक कविता
बिकृत मनोवृत्तिची द्योतक आहे
मी म्हणतो

नुस्तीच विकृती नसून
धार्मिक नि सांस्कृतिक विकृती आहे
सर थोडे गरम होतात
आवाज चढवतात
म्हणतात
लोकमनोवृत्तीनुसार कवी नि कवितेंची ही घडण
इथे धार्मिक नि सांस्कृतिक संबंध नाही
मी म्हण्तो आहे.
कुलगुरु तुला काही कळले कारे.
जिथं अ येईल
तिथं हा कवी ॐ लिहतो
सर म्हणतात
ह्या ॐ ला काही अर्थ नाही
मी म्हण्तो आहे
धर्माची प्रेरणा नि मोक्षाची लालूच
म्हणून
जिथं जिथं अ येईल
तिथ हा कवी ॐ ॐ लिहित राहील
आमच्या सरांना हे कळल नाही
सांगून सुद्धा पटल नाही
कुलगुरु तुला काही कळलं कारे

ज्ञानेश्वरीच्या घोळात सर घुसतात
गुदमरतात म्हणतात
संतामध्ये आध्यात्मिक समता होती

मी म्हणतो नाही
संत चोखामेळयाच मरण
संत ज्ञानेश्वराच शुद्धीपत्र मला आठवतं
मी माझे मत मांडतो
सामाजिक समस्येवर आम्ही घसरतो
विषय फाटतो मी उसळतो
इथल्या दरिद्री अध्यात्म्यान
माणसाला हरघडी उदास केलय
कुलगुरु तुला काही कळतय कारे

एकदा असेच ते मुडमध्ये येतात म्हणतात
– – – – – – हे सारे
कुरुक्षेत्रावर समरप्रसंगी घडतेय
युद्धप्रवृत्त करण्यासाठी अर्जुनास
श्रीकृष्ण गीता सांगतोय
इत्तंभूत तेच संजय धृतराष्ट्रास सांगतोय
तेच श्रोत्यांना ज्ञानेश्वरांनी सांगीतलेले
आज मी तुम्हाला सांगतोय
"माझी आज्ञा म्हणून सूर्य उगवतो
माझी आज्ञा म्हणून समुद्र मर्यादा सोडत नाही
माझ्याशिवाय काहीच घडत नाही
चराचर हालत नाही
माझ मोठपण जाण मला शरण ये".
हा भाडखाव नि लुभ्रेषणा
शरणागती अन् गवळणपणा

वायफळ पकपक नि षंढपणा
गीतारहस्यातील मुढपणा
माझ्या गतिशील मनाला पटत नाही
हे कुलगुरु
ज्यानं दिलय मनोराज्य माणसाला
समतेचे बंधुतेचे स्वातंत्र्याचे नि न्यायाचे
त्या बुद्धाला अन् आता आम्हाला
तू तापदायक ठरतोहेस
खर सांग
पळतोय काय अरे
'जग्नमिथ्या'
कोणाला शिकवतोहेस हेतुपुरस्सर हे तू
कुलगुरु ठिका शाना बन

आजकाल लोकं नावं बदलताहेत
सर म्हणतात
हे काही बरोबर नाही
मी म्हणतो आहे
हिंदुधर्माचा त्याग बौद्धधम्माचा स्विकार
हरिजन नामकरणाचा निषेध नि दहन मला आठवते
मी माझे मत मांडतो
सर म्हणतात काही बाबतीत योग्य आहे
मी म्हणतो आवश्यक आहे.
कुलगुरु तुला काही कळलं कारे

सर टेबलावर मुठ आपटतात

माझ्याकडेच बघत असतात
म्हणतात
काही झाल तरी शेवटी
हिंदुधर्म झिंदाबाद असेच मी म्हणेन
टेबलावर मुठ आपटली जाते
स्वाभाविकपणे
सरांकडेच मी बघत असतो
म्हणतो
सर तुम्ही कितीही हिंदुधर्म झिंदाबाद म्हणा
माझा त्याला विरोध असेल
कुलगुरु तुला काही कळलं कारे

सारे अैकून सुन्न होतात
वर्गाबाहेर येतात
पोतनिस, सौ. देशपांडे, डोंगरे, रेडकर, आळतेकर,
पाटील पंगेरकर खानोलकर निपज
अन् साऱ्यांना मी विचारतोय हेच ते
ते तुझ्यावर नाराज
मला फॉर
मी तुझ्याविरुद्ध
उतरलोय युद्धभूमिवर मनमुक्तपणे
तुझे गुणगाण गाणाऱ्यांच्या पोटात
उठलाय वायगोळा
मी स्विकारलेल्या भूमिकेमूळे.

# आम्ही सूर्यालाही अंकित करु

आमच्या अस्तित्वाचा नकार
आम्हाला मानवला नाही
म्हणूनच
उभारल्या जातायत चळवळी आज
हि धडपड
तुम्हाला जाणवलही नसेल
पण आम्ही ओळखलं आहे
काळा बरोबर वाहणारी
ही वाढती झुंज आम्हाला लढवलीच पाहिजे
आमच्या अस्तित्वालाच नकार असेल तर
अंतरिच अग्निकुंड दाही दिशांना पसरेल
माणसाच मोठेपण तुम्हाला मान्यच नसेल तर
ठिणगी ठिणगीतून वणवा पेटेल
तुमच्या कावेबाजपणाला
बळी पडलेल माझ जग
हि चिघळणारी जखम, धुमसणारी आग
उसळता उद्रेक, जयभीमचा ज्वालामुखी
थोपवतोय हाराकिरी, सावरतोय वाताहत
फोडतोय कोंडी, परजतोय आयुधं

हे तडफडणारं जग, दासानुदासच दास्यत्व
घालविण्यासाठी
अस्तित्व अन् अस्मिता
नव्या विकासाची नांदी
विद्रोहाची वाटचाल जगाला घोषित करुन
उज्वल भविष्याच स्वप्न साकारण्यासाठी
आम्हीं सूर्यालाही अंकित करु.

# गनिमी आयुष्यात

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४६३
२३६८६
काव्य
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

ओठांगणी भूकवस्ती भुंकणारी वाटचाल
वर्दळीत वासनेच्या ठिसुळणारी पायवाट
सादळलेल्या सांजवेळी
हरवलेल्या पाऊलखुणा वळणावर रुळतांना
जखडलेल्या जीवासाठी तेच घणाघात घडताहेत
अशावेळी
कोसळणाऱ्या उल्केला विझतांना आठवलेच पाहिजे
चिघळणाऱ्या जखमेला आग लावतांना
वादळी विजेची संगत साधलीच पाहिजे
तरच होईल उष:काल
ह्या गनिमी आयुष्यात क्रांतिमय होतांना

# आपण असे शब्द जगू

धर्मसंगराची धग उरात घेऊन
रणकंदणास
आम्ही सिद्ध झालो आहोत
आमच्या मनाला लागलेहेत वेध
सम्यक संस्कृतीचे
म्हणून
तुम्ही जाल तिथ आम्ही तुमचा माग काढत येऊ
तुम्ही छुपाल तिथून आम्ही तुम्हास शोधून काढू
उराडात धगधगतीहे अखंड आग
शब्दाला कैद करत शब्द पडताहेत बाहेर
जाळ होऊन
शब्दाला दिली जातेय जात
जातीला दिला जातोय धर्म
धर्माला दिल जातय स्वत्व
जे संहाराची किमया जपते
शस्त्रांना आपलेसे करुन
लोकजीवनाला संख्याबळाच्या पारडीत तोलते
नासधुसीला नतमस्तक करण्याऐवजो
वादळात जीवनघडी घिस्कटावी
तशी आपली वाताहत केली जातेय
डोळ्यादेखत होतेय
घरांची जाळपोळ

पाणी टाकावं तरी विझत नाही
पोरं शाळेत जातायत
घरी जात विसरुन येत नाहीत
असल्या सुसंस्कारी अन्यायाची किमया
आपण ओळखली पाहिजे
त्यांनी शस्त्रासारखा शब्दाचा वापर केलाय
स्वार्थ्यासाठी आपला बळी देवून
आपली चिरफाड केलीय शब्दांना गुलाम करुन
म्हणून
शब्दसारखे जीवनापासून परागंदा झालेत बेईमान होऊन
झगडत नाहीत हक्कासाठी पेटवल्या वाचून
जे भिडत नाहीत हृदयाला आपणहून
म्हणूनच
कैद केलेला प्रत्येक शब्द मी पेटवतोय
शब्दाला त्याची सजा ठोठावतोय
जिविताला जाळणाऱ्या
त्याच्या बेईमान अस्तित्वाला विचारतोय
मनोभूमिवर आदळतोय
वाढत्या स्पंदनातून मग तो
वादळ वाऱ्यासारखा बोलू लागतोय
तुझ्या उध्वस्त आयुष्याचे अवशेष
धर्मग्रंथात बांधलेले
धर्मग्रंथाची बांधिलकी स्विकारलेल्या समष्ठिन
तुला गुलाम ठरविलेले
जे तू पेटवून दिलेस

मनमुक्तपणे

असेच

"सॉक्रेटिसा
शब्दाच्या मोठेपणासाठी
तू मरणालाही लाजवलेस
शब्दाला तू तुझे सामर्थ्य दिलेस
अजून
तुझे सामर्थ्य सत्याचा पाठपुरावा करतेय
जुलूमशाहीला हादरे देतेय"

शब्दाच बळ आपण ओळखल पाहिजे
शब्दाची कत्तल आपण थांबविली पाहिजे

आपण असे शब्द जगू
जे लढ्याला सामर्थ्य देतील
जे जन्माला जीवन देतील.

## कायद्याविरुद्ध

आज अचानक
धुळ उडवत सशस्त्र जीप आली
त्यान वाचल होतं त्याबरहुकूम
जमिनदाराची हवेली हादरुन गेली
उगीचच सर्वत्र सामसूम असल्यासारखी
शांतता पसरली
तुमच्यासाठी जनतेच्या भल्यासाठी
आम्ही हे करीत आहोत
त्यांच्या भाषेत त्यांनी गावकऱ्यांना
कानोकान खबर दिली
नंतर ते वाऱ्यासारखे निघून गेले
त्यांच्या मनात विचाराची वाढती वादळं
कायद्यान शस्त्र बाळगण्याची बंदी
त्यांनी तर सरसहा कत्तल केली
त्यान कायद्याची पुस्तक चाळली
गरीबीला कारण ठरणाऱ्या कायद्याच्या
परिवर्तनासाठी अघोरी अपरिहार्यता
जमिनदाराची कत्तल त्याला दुखवत राहली
त्यान खेडयाची वाडयावाडयाची नाडी तपासली
जमिनदारीच्या नायनाटासाठी
कायद्याविरुद्धच कारवाईची आवश्कक्ता
त्याला जाणवली
त्यान शस्त्र घडवायला सुरवात केली
कायद्याच्या राजवटीसाठी

## बुद्धाचे शब्द घेऊन

आपणच
"काश्मिर ते कन्याकुमारीपर्यंत
भारत एक आहे" चे फलक
भर रस्त्यावर बसवर लोकल ट्रेन्सवर
ट्रकवर दळणवळणाच्या हरेक सरकारी साधनावर
शाळा कॉलेजच्या भितीवर
कारखाने गिरण्या चिमण्या नि चबुतऱ्यावर
प्रेक्षणीय स्थळांच्या प्रदर्शनाच्या आसपास कुठेही
मुताऱ्यांवर मंदिरावर तिकीटावर हवाई अड्डयावर
सेवन फोर सेवन नंबरच्या बोर्डींगवर
बंदरावर बंदरावरील बोटीवर बराकीवर
फुटपाथ नि प्लॅटफॉर्म नि गजबजलेल्या मैदानवर
वाचता वाचता
घेताहोत निर्णय
आपल्या विरुद्ध
मिरवणूकीची दंगल होईपर्यंत
करताहोत दगडफेक जनसमुहावर
बऱ्याच काहीबाहीवर बंदीचा विचार करणारे
आज हे बंद उद्या ते बंद
काहीबाहीवरुन परवा आणखी काहीबाही बंद पाडणारे
बंदीचा बाजार उघडून दंदल घडवणारे
दंगल घडवून संचारबंदी जारी करवणारे

उघड्या नागड्यांना उन्हापावसात वणवणवत
वाळत भिजत सुकवत भुकेल भिरभिरवत
ठणाण कोकलत ठेवणारे
नग्नभग्न निर्वासित करणारे
दुखावलेल्यांना संरक्षणाची हमी न देऊ शकणारे
आपणच"

शस्त्र बाळगण्याची बंदी असलेल्या ह्या देशात
कायद्यावर कुरघोडी करणारं
माणसाला सुखासुखी जगू न देणारं मानवीमन
दहशतीच्या वातावरणात
गस्त घालणारी पोलीसदलं
कुणाच्या दारावरुन कुणाच्या घराकडे
नेम धरताहेत हरामखोर
माणसाला धेड म्हणून हिणवणाऱ्या
देशभक्ताबद्दल
हे देशा तूच सांग मनांत काय बाळगाव
त्यांची अंतिम इच्छा
तुझ्या स्वातंत्र्यासाठी
गीता हाती घेऊन फासावर गेलीय.
तीच गीता
तुझ्या छाताडावर
आज मी माझ्या स्वातंत्र्यासाठी
जाळून टाकतोय
ते तू आणि मी

वाढती रस्सीखेच ओढाताण
आपणच या अर्थाने
हरवून बसलेले आपलेपण.

म्हणूनच

चोहोबाजूंनी उसवत गेलेलं मन
असंतोषाचा अंगार घेऊन
ह्या निर्दयी सजावटीच्या व्यवस्थेविरूद्ध
करतेहे बंड
म्हणतेहे
ज्याशिवाय जगता येणार नाही
असे बुद्धाचे विचार आपण जगू या
माणसाला गुलाम करणाऱ्याला चाबकानें फोडून
ताळ्यावर आणू या
माणसाच्या मोठेपणासाठी धुमसत राहुया
म्हणूनच

स्वसंरक्षणाचा निर्णय घेऊन
बेडरपणे मी येतोय तुमच्याकडे
बुद्धाचे शब्द घेऊन

# पेरणी

त्या कोरीवपणात
जी काळाला विसरता आली नाही
अशी
आज बहरुन आलेली पेरणी
अजूनही
पायाखालची पडिक जमिन
खाचखळगे दलदल अगणित अडथळे
छळणूक यातायात दुखापत
तरीही हरकत नाही
निश्चयाने अशी पेरणी करायची
"माणसाला वेठीस धरणारा विचार ठोकरणारी"
बुद्धाची कोरीव लेणी
स्मितांकित चेहरा
"तुम्ही सर्व स्वतंत्र आहात"
अशी पेरणी करायची
जी विसरता येणार नाही काळाला
जिला कधिही मरण नाही.

## संदेश

काडी लाव पोटाला
पायापुरतं जगू नको
बदनाम संस्कृतीचा सापळा
स्मशान उकरुन
नाचवू नको

लाल रक्ताची माणसं सार
मग जळतात का
जाळतात का
कलालाच्या कुंटणखाण्यात
नरडीला नख देऊन
आईला लुटतात का
छेडतात का

मध्यान्हीचा उंबरठा
हाती कटोरा सोन्याचा
खांद्याला चिंध्या
रेशमी झोळीच्या

सोन्याचा कटोरा
अश्रुंनी गुदमरला
अश्रुंचे हे गीत

रेशमाची झोळी
आगीनं पेटलेली
आगीचे हे गीत

पेटलेली माणसं
आगीला आहुती
आहुतीचे हे गीत

"सूर्यासारखं बघायच
वाऱ्यासारखं धावायच
सागरासारखं जगायच
सरतांना शेवटी सरणावरती
पौर्णिमेसारखं हसायच हाय"

माणसासाठीं गीत
गीताची गुणगुण
माणसाम करावी
माणसासाठी

काडी लाव पोटाला.
पायापुर्तं जगू नको.
बदनाम संस्कृतीचा सापळा
स्मशान उकरुन
नाचवू नको.

## उठाव

हातावरचं जीण जगत
दररोज दुसऱ्या दिवसाकडं जातांना
रस्त्यालगत भुकेलेली वस्ती विसावलेली
तिच्या हाळी आधीच
भल्या सकाळी उठलेला हॉटेलचा उस्मान
मुरळ्या जोगती वाघे पोतराज
भूते भोपे भिल्ल भंगी वेशावळ
डोंबारी गारुडी गोसावी बामण बैरागी वारली
आग्री कोळी कुणबी महार मातंग सिय्या
सून्नी लभाणी फाडीवडार
मातीवडार डराव डराव
कागदवाली मुलं दिशाहिन होऊ लागलेली
अशीच कितीतरी कुठतरी माणसं भरकटून भरकटलेला
देवाधिदेवांची चित्र रेखाटून हात पसरुन पसरलेली
बाजूला सुस्त वाटणाऱ्या उंचचउंच इमारतीवर इमारती
कबुतरांची फडफड डोक्यावर भिरभिरुन भिरभिरणारी
रस्त्यावरची रहदारी अन् आडोशाला पावलावर ती तिच्या बाजूला ती
तिच्या सारख्यांची गर्दि
मनी
मिठीतील मोह मोहरिल मन
मनातील खूण सैल झालेली उदासवाणी
तिनं माळलेल्या गजऱ्यातील फुलं मोगऱ्याची

गळु लागलेली कोमेजलेली केविलवाणी
दुसऱ्या दिवसाकडं जातांना
हातावरच जीणं जगनारांची
त्या दिवशी रस्त्यावर गर्दिच गर्दि
तेंव्हा
तिच्या सारख्यांना उद्देशून
जाहिर सभेत त्यांन फायर केली

– – – – आमच्या धर्मांतराचा अर्थ नीट लक्षात घ्या. आम्ही धर्मांतर करीत आहोत ते या दुर्गंधीच्या वातावरणातून बाहेर पडण्याकरिता करीत आहोत. सर्वांना समतेचे स्वाभिमानाचे व आदर्श जीवित लाभून त्यांचा आयुष्यक्रम उज्वल व्हावा या दृष्टिने आम्ही धर्मांतरास तयार झालो आहेत. तुम्हाला जर आमच्याबरोबर यावयाचे असेल तर तुम्ही प्रथम हा आपला दुर्गंधित आयुष्यक्रम अजिबात सोडून दिला पाहिजे. तुमच्या मलीन वृत्तीचा तुम्हास त्याग केला पाहिजे. हे करण्यास तुम्ही तयार असाल तर तुम्ही आमच्या बरोबर या. नाहीतर तुम्ही आमच्याबरोबर येऊ नका. वाटल्यास तुम्ही आहात त्याच ठिकाणी रहा. तुम्ही मुसलमान व्हा किंवा ख्रिश्चन व्हा. आमची त्यास हरकत नाही. परंतु जर आमच्या बरोबर तुम्हास यावयाचे असेल तर तुम्ही काया, वाचा व मन यांची शुद्धि करून व त्रिशुद्धिने शुचिर्भूत होऊनच तुम्हाला आमच्याबरोबर येता येईल. नाहीतर मी तुम्हाला स्पष्टपणें सांगतो. तुम्हाला आमच्याबरोबर येता येणार नाही. मी तुम्हाला येऊ देणार नाही. आणि जर तुम्ही आपला आयुष्य क्रम पुर्वव्रत चालू ठेवून महार जातीस बट्टा लावण्याचे कार्य सोडणार नाही तर मी तुम्हाला बजावून

सांगतो की हजारों स्वयंसेवक तयार करुन मी तुमचा कामाठी-
पुऱ्यातून उठाव करीन !

*

नजरे समोर
तिनं हळूच काढलेला
कोमेजलेला गजरा
मनातील मोह मावळलेला
प्रेरणाशील मनानं
दुसऱ्या दिवसाकडं जातांना
तीनं उस्मानला हाक मारली नाही
पाव रोटी खिम्याची प्लेट की कोंबडीची टांगसुद्धा
मागवली नाही
ती उठली
उगवत्या सूर्याला स्वतःहून सामोरे जातांना
तिच्या नजरेत
त्यानं फेकलेल्या बॉम्ब स्फोटात
पेटू लागलेली वस्ती.

## आम्ही आहोत

अन्न वस्त्र निवाऱ्यास
वाढती नंगे इथे
आम्ही आहोत
अर्ध संन्यासी जन्मताच
जुळवीत भंगलेली स्वप्न
जगतांना जखम जिंदगीची
उरात घेऊन
पोटावर पिळलेले रक्तमास गळलेले
हरवलेले तारुण्य वेळेला विकलेले
उगवतीला मुकलेले
शिवारावर ओनावून
पंगुत्वासाठी कुबड्या वापराव्यात
तसल्याच गरजेने
आवारा आयुष्याचे
लगाम शोधणारे
बुद्धि तर ज्ञान मिळवा
डोळे तर दृष्टि मिळवा
हात तर हत्यार मिळवा
पाय तर मार्ग मिळवा
समाज सत्ता संस्कृतीला सुरुंग लावा
ससेहोलपटच होतेयना या खंडप्राय देशात
देशाची अन् आपली
तर हि बहकलेली व्यवस्थाच तळागाळातून
उखडून फेका.

## कबर

कौलातून ठिबकणाऱ्या पाण्यात
कलम झालेल्या हातांनी
जगभर उधळलेल्या रक्तफुलांची आठवण
तू आकारलीस त्याच्या लाडकीची कबर
तो सुखावला
नकळत
त्यानं बांधली तुझ्या कलेची कबर
तू दुखावलास
सुख दुःख जीवन छायापडछायाचा खेळ
आकारतोय आम्ही नव्या जगासाठी
नवे ताजमहाल उंच उंच
जिथून माणूस मुंगी एवढा थोटा भासतोय
मात्र ते विसरले नाहीत
सुखशैयेवर लोळण्याआधी
आपले हात कलम करायला
तेव्हा तुझी आठवण
रक्तफुलांनी रंगलेले ताजमहालही
हादरतील कौलातून ठिबकणाऱ्या पाण्यात.

## क्रांतिप्रवण धर्माच्या विद्रोही वाटेवर

अरेरे
खेड्यात वसलेला हा देश
यातना वरांनी घेरलाय्
वाहतोय अखंड अश्रूंचा ओघ
घडतोय अगिन्ती अत्याचार
अत्याचाराला तुझ्या महात्मेपणाचा आधार
तू दिलाहेस अत्याचाराला जन्म
जन्माच तू गातेस मोठेपण आजपर्यंत
"सारी प्राणीमात्र इश्वराची लेकरं"
इथ
इश्वराच्या घरावरात विषमता
नि
देबदेवळात वाढते दानवीकरण
ह्या दगडांच्या देशात
नवस म्हणून बोकड सोडावा
तशा देवदासी सोडल्या जातायत
भोगल्या जातायत
बिनबोभाटपणें उठताहेत वादळं विधानसभेत
गोहत्त्या बंदीवर
घडतायत प्रवचन गीतेवर
गंगेत गांड धुणारांनी
चालवलय पावित्र्याच विडंबन

विडंबनान केलाय घोषित गंगेचा उगम
गायीच्या योनितून
गायीला तुम्ही स्पर्श करा
गंगेच तुम्ही प्राशन करा
गीतेच तुम्ही पठण करा
हया भडवेगीरीन घरात घुसलेय पाणी
देवभोळयांनो घराबाहेर या
तरी ते बडबडताहेत
"वेदाभ्यासानच हया देशात सर्वंकष क्रांति होईल"
अब क्या बोले
साला
कुत्ते की दुम तेडी की तेंडी
आज
स्वातंत्र्याच्या मुक्तद्वारावर वावरताहेत मारेकरी
भासतोय समता स्वातंत्र्य बंधुतेचा अभाव
दाहिदिशेतून
ज्या दिशेला पाऊल ठेवू दिशाहिन होऊ
हया देशात
अज्ञान अत्याचार देवभोळेपणाचा आढळ
सुटणार नाही नजरेतून
नजरबंद झालेय स्वातंत्र्य
समतेशिवाय स्वातंत्र्य
बंधुतेशिवाय स्वातंत्र्य
न्यायाशिवाय स्वातंत्र्य
स्वात्रंत्र्य ?

मुख्यानेच मुहुर्तावरची मौनव्रत
उधळताहेत राजरथ आपल्याविरुद्ध
परजली जाताहेत शस्त्र
वापरली जाताहेत अध्यात्म्यशास्त्र
जी झुगारलीहित अडीच हजारवर्षापूर्वी बुद्धान
बंधमुक्त आंबेडकरी बंडात
तरी इथलं जीवन
जीताजागता छळवाद
छळवादाच्या तऱ्हा
तऱ्हेवाईक जीवन
ठायीठायी तुडवले नागवले जाताहोत आपण
अखेर
आपणाकडूनच घडणार हे परिवर्तन
सांस्कृतिक बदल
मानवी जीवन
आंबेडकरांच्या आदेशाने
क्रांतिप्रवण धम्माच्या विद्रोही वाटेवर

## उरस्फोटातून उसळलेल्या शब्दानच

डोक्यावरचा सूर्य
पायाखालची जमिन
जमिनीवरची संगीनसावली
चिताळलेल्या काळोखासारखी
नजरेत ठसठसलेली
सभोवतीची भयाण सृष्टी
ती भेसूर कहानी करपलेली
माणसाच्या अधुपणाची
हचा मध्यान्हीच्या वेळी
आज
आपल्याच आदिसंतान ओठांनी
ही भूमि चुंबायची कसायची राबवायची
फुलवायची
तर आपल्याच भूमिवर आपण भूमिहिन
वारा वाहिल तसे भरकटत आहोत
डोळचादेखत भूकबळी
मूकपणे
आपण भूईसपाट होत आहोत
सूर्य झुकेल तशा सरपटणाऱ्या
सावलीसह आजही संथपणे
आडोशाला आपण घेताहोत वळसे
जगताहोत नजरबंद वास्तवात

सभोवती उभारलेल्या भिंती
सूर्य
मी
आणि
माझी सावली
ह्या भूमिवर सरपटणारी
जिनं तडफडवला होता माझा जीव
हिरावून घेतले होते जगण्याचे हक्क
हे विसरता येत नाही
तिनं साधला होता दुष्मनदावा
जगबलं होत मन मारुन मुस्क्याबांधुन
तेव्हापासून
होरपळलेल हतवीर्य वादळ
धुमसत होतं ज्ञानावाचून शस्त्रावाचून स्थैर्यावाचून
निपचित पडलं होतं कोलाहलातून
विकृत संस्कृतीच्या अडगळीला
काळोखात नतमस्तक होऊन
आज
बुद्धिझमची जाणीव झालेल माझ मन
बंदिस्त करण्याचा
तिचा केविलवाणा खटाटोप
उधळतोय उरस्फोटातून उसळलेल्या शब्दानच
हादरतेय इथली जमिन.

## कुणी भेटलेच तर

अस्तित्वहिन क्षणाची आठवण
त्यात एकाकीपण
आपल्याच पावलाचे आहाट अैकून
दचकू लागलेले मन
मागे वळून बघावं तर
ओकीबोकी वाट
सभोवार सूनसाम असावं
"गळून पडणाऱ्या पिसाची अवस्था लाभलेली
आयुष्यात आपणच आपल्याला कुठवर जपावं"
टळून गेलेलं आयुष्य
पिंगा घालणाऱ्या आठवणी
आठवणीतील माणसं
आजच्या एकटेपणात
भरुन आलेल मन
कुणासाठी कळत नाही
हरवलेले असे काही क्षण
जपायचेत पुढच्या एकाकीपणात
कुणी भेटलेच तर.

## प्रबुद्धत्व

मी खोदू लागलोय बुरुज
माझ्या भवतीचे
कडीबंद काळोखाचे
कलंडू लागलेय कवाड
त्याच वेळी वारा बोलू लागलाय
दचकू लागलेले श्वास
आणि माझ्या निश्वासा आधीच
पिंपळपान सळसळी वारा होऊन
आता मला खोदलेच पाहिजेत
माझ्या भवतीचे बुरुज
प्रबुद्ध होऊन.

# धम्म

दुःखितांशी आपण असं बोलू
जसा बोलला होता बुद्ध
आणि पुढे जाऊ
अशा ठिकाणी जाऊ
जिथं असेल दुःख
दुःखाबद्दल बुद्ध बराच काही बोलला होता
आणि आपण पुढे पुढेच जाऊ
जसा बुद्ध गेला . .
आयुष्याच्या अखेर पर्यंत.

## कम्म

ह्या जगात
एकदाच यायचं आल माणून आल काम
ह्या जगातून
एकदाच जायचं गेल माणूस गेल काम
माणसाला समजून घेणारी
सम्यक संस्कृती
घडविण्याच आपलं काम
आपण मात्र केलच पाहिजे
आयुष्याच्या अखेर पर्यंत.

# ड्रॅगन पोएट्री

"मी हिंदु धर्मात जन्मलो तरी
हिंदु धर्मात मरणार नाहीं"
तुझ्या घनघोर प्रतिज्ञेस
जींवनभरच्या रणकंदणास
मरणापर्यंतच्या प्रबुद्ध वाटचालीस स्मरून
हातात तलवार नि तळहातावर शिर घेऊन
"मी बौद्ध आहे आणि बौद्ध म्हणूनच मरणार आहे"
ह्या पेटलेल्या देशात
माझ मरण
जगजहिर करुन
प्रतिज्ञेसाठीं
रणकंदणासाठी
मरणापर्यंत बौद्धमय भारतासाठी
अजिक्य आगेकूच करतांना
तूला मी पुरेपूर पारखून घेत आहे
तू म्हणजे
हरेक अपप्रवृत्ती विरुद्धच बंड आहेस
हिंदुना मिळालेंल आव्हान आहेस
जातियतेन बरबटलेली महाकाव्य
उध्वस्त करणारं क्रांतिकाव्य आहेस
गुलमाला गुलामींचीं जाणींव देवून
बंडातून बंड निर्मिणारा बंडखोर आहेस

नांगराच्या फाळाची तलवार करून
"शस्त्र धारण करणें हा आपले मानवी
स्वातंत्र्य मिळविण्याचा शेवटचा उपाय आहे"
हे शिकवणारा झुंजार सेनानी आहेस
हिंदु धर्माला धम्मान धिक्कारणार विज्ञान आहेस
वेदांच अपौरूषयत्व धिक्कारुन
मनुस्मृती दहण करणारा विचारवंत आहेस
गीता गवळयांनी गायलेला पोवाडा ठरवून
देवाधिदेवांची धुळधाण करणारा मुर्तिभंजक आहेस
बुद्धाचा घात करणाऱ्यांना
वठणीवर आणून बुद्धाला न्याय देणारा
न्यायाधिश आहेस
जीवन जळतफळतजळत ठेवणारा जातियवाद जाळून
जीवनासाठी धुमसत राहणारा
जिवंत ज्वालामुखी आहेस
क्रांतिला जन्म देवून
विजयाकडून विजयासाठीच विजयाकडे
नेणारा क्रांतिवीर आहेस
"मानवतेवर प्रेम करणारा
प्रेम करायला शिकवणारा
प्रेमान जग जिंकणारा
जगन्नजेता आहेस"
"स्वातंत्र्य म्हणजेच जीवन
जीवनासाठी लढणारा
लढयाला दिशा देणारा

दाहिदिशा व्यापणारा स्वातंत्र्य सूर्य आहेस ”
मानवी मूल्याची जाणीव देवून
जोपासना करणारा अट्टाहास धरणारा
आंदोलन करणारा महान घटनाकार आहेस
राज्यसमाजवादाचें महान ध्येय संसदेला सादर करुन
कायद्यान समाजबदलणारा
कामगार क्रांतीला गार करणाऱ्या
जातीयतेला ठार करुन
क्रांतीचा कायापालट करणारा
कम्युनिझमला बुद्धिझम
बुध्दिझम आणि बुध्दिझमच
जगाला रोखठोकठाम जीवनोत्तर देणारा
विश्वभूषण बुध्दिष्ट आहेस
बुध्द कबीर फुलेंचा मार्ग स्विकारुन
वारसा देणारा विद्रोह आहेस
तुझ्याशिवाय काळ पुढे सरकू शकत नाही
तू घडविलेला इतिहास विसरु शकत नाही
इथून पुढे हा देश
इथून पुढे हे जग
इथून पुढचा काळ
तुझ्या नावानच ओळखला जाईल
काळाचाही इतिहास घडविणारा
सुरुंगाशिवाय सिमा उध्वस्त करुन
दाहिदिशांना देशोदेशी संचारणारा
विजयाकडून विजयासाठीच विजयाकडे
अजिक्य आगेकूच करणारा ड्रॅगन आहेस

## 'अत्त दीप भव'

२७६३
२३६२६
काव्य ११/४८

आकाशाकडे बोट दाखवतांना
ते पायाखालची माती विसरले
" God, save them they do not know
what they do "
नुस्तेच वर टक डोळे पहात बोलले
प्रेषित देवाचा पुत्र पैगंबर देवाधिदेव झालें
आकाशात डोळे कुठे स्थिर ठेवायचे
न उमजलेले मन मिटून नतमस्तक
मातीवर डोळे कुठे स्थिर ठेवायचे
कुठच्या नात्याचे गीत गायचे
नकळून ते नुस्तेच भरकटत रहालेत
खरोखरच त्यांची कीव येंते
जे हरवून बसलेंहेत
निर्भयपणे
आकाश न्याहाळणारे
माती पारखणारे
मनाला मुक्तिचे बंड
बंडाला धम्माचे अधिष्ठान देणारे
जीवनाचा तळठाव जाणणारे
तुझे प्रबुद्ध विजिगिषु डोळे
'अत्त दीप भव' चा संदेश देणारे.

REFBK-0023626



मनूने केलेली मुस्कटदाबी झुगारतांना
आम्ही
देवाची दुनियादारी दफन करताहोत
आत्म्याच नागडंपण जगजाहिर करतांना
ब्रम्हांडावर शेवटची मुठभर माती टाकताहोत
वेदांची आज्ञा नाकारतांना
मोक्षाचीं अभिलाषा ठोकरताहोत
ब्रम्हसत्याच्या धर्माला सुरुंग लावतांना
संस्कृत – संस्कृतीची धुळधाण करताहोत
अशावेळी
हे प्रियदर्शी राजा
तू घडविलेंल्या सिंहस्तंभावर
मी तलवार परजून घेतोय.